मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४९३८४८२



# अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी केली पालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामाची पाहणी!

## सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे दिले निर्देश



पिंपरी-चिंचवड।
न्यूज एक्स्प्रेस मराठी ।

पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या नव्याने तयार होत असलेल्या इमारतीचे काम आयुक्त शेखर सिंह यांच्या सूचनेनुसार मुदतीत पूर्ण करण्यात यावे तसेच प्रत्येक कामगार, अधिकारी कामावर असताना सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे असे निर्देशही अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी संबंधित अधिका-यांना दिले. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी आज नव्याने तयार होत असलेल्या महापालिका नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामाची तसेच भक्ती शक्ती ते मुकाई चौक आणि मुकाई चौक ते भोंडवे कॉर्नर या रस्त्यांची आणि रावेत येथील रेल्वे उड्डाण पुलाच्या कामांची पाहणी केली त्यावेळी त्यांनी निर्देश दिले. प्रकल्पांच्या पाहणीच्या वेळी त्यांचे समवेत सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता बापुसाहेब गायकवाड,उप अभियंता विजयसिंह भोसले,कनिष्ठ अभियंता संतोष कुदळे आणि केतकी कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी महापालिका नवीन इमारतीच्या खोदकामाची पाहणी करून प्रकल्पाची संपूर्ण माहिती घेतली. सहशहर अभियंता ओंभासे यांनी नवीन इमारतीस ३६ महिने लागणार असून सुरू असलेल्या कामाबाबत माहिती दिली. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त यांनी रावेत येथील रेल्वे उड्डाण पुलाच्या कामांची सखोल माहिती घेतली. सह शहर अभियंता ओंभासे यांनी मुख्यत्वेकरून जमीन अधिग्रहण करण्यात झालेला विलंब यामुळे या प्रकल्पाचे काम थांबले होते परंतू आता सदर काम वेगाने सुरू असून पुढील तीन महिन्यात काम पूर्ण होईल असे सांगितले. त्यानंतर कार्यकारी अभियंता बापुसाहेब गायकवाड यांनी रावेत येथील उड्डाण पूल ते मुकाई चौक या रस्त्यांची विकास मंजूर आराखड्यातील ४५ मीटर रुंदीप्रमाणे अद्यापही काही जागा ताब्यात नसल्याने या रस्त्याचे कामास विलंब झाल्याचे सांगितले. त्यावर अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी या संपूर्ण रस्त्यांची पाहणी करून माहिती घेतली आणि आपल्याला पुढील काळात ते काम तातडीने पूर्ण करायचे आहे असे सांगितले,त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून संपूर्ण प्रकल्प मार्गी लावा असे सांगितले. मुकाई चौक ते भोंडवे कॉर्नर या रस्त्याचे पदपथाचे काम वेळेत पूर्ण करा अशा सूचनाही अतिरिक्त आयुक्तांनी केल्या.

### तीन महिन्यात काम पूर्ण होईल

**» अतिरिक्त आयुक्त यांनी रावेत येथील रेल्वे उड्डाण पुलाच्या कामांची सखोल माहिती घेतली. सह शहर अभियंता ओंभासे यांनी मुख्यत्वेकरून जमीन अधिग्रहण करण्यात झालेला विलंब यामुळे या प्रकल्पाचे काम थांबले होते परंतू आता सदर काम वेगाने सुरू असून पुढील तीन महिन्यात काम पूर्ण होईल असे सांगितले. त्यानंतर कार्यकारी अभियंता बापुसाहेब गायकवाड यांनी रावेत येथील उड्डाण पूल ते मुकाई चौक या रस्त्यांची विकास मंजूर आराखड्यातील ४५ मीटर रुंदीप्रमाणे अद्यापही काही जागा ताब्यात नसल्याने या रस्त्याचे कामास विलंब झाल्याचे सांगितले.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये शिव महापुराण विचारांचा जागर!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचा पुढाकार




पिंपरी-चिंचवड।
न्यूज एक्स्प्रेस मराठी।

उद्योगनगरी' पिंपरी-चिंचवडमध्ये शिव महापुराण विचारांचा जागर व्हावा. त्यानिमित्ताने तब्बल सात दिवस कथा श्रवण करता यावी याकरिता श्री अष्टविनायक शिव महापुराण कथा वाचनाचे आयोजन केले आहे. परमपूज्य पंडित प्रदीप शर्मा यांच्या सुश्राव्य वाणीतून हा अभूतपूर्व अध्यात्मिक सोहळा रंगणार आहे, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी दिली. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवार, निर्माल्य फाउंडेशन यांच्या वतीने श्री अष्टविनायक शिवमहापुराण कथेचे आयोजन दि. १५ ते २१ सप्टेंबर २०२३ दरम्यान दुपारी २ ते ५ या वेळेत पीडब्ल्यूडी मैदान, नवी सांगवी येथे केले आहे. मध्यप्रदेश येथील प. पु. पंडित प्रदीप मिश्रा यांच्या अमोघ वाणीतून ही कथा ऐकण्याची संधी पिंपरी-चिंचवडवासीयांना मिळणार आहे.

पंडित प्रदीप मिश्रा यांचे हजारो अनुयायी कथेचे श्रवण करण्यासाठी येणार आहेत. या दिवसांमध्ये सुमारे आठ ते नऊ लाख श्रोते या कथेचे श्रवण करतील. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. वेगाने विकसित होणाऱ्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये भक्ती आणि शक्ती अशा दोन्ही गुणांचा संगम झाला आहे. याची अनेक प्रतीके शहरात उपलब्ध आहे. हाच भक्ती आणि शक्तीचा वसा लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी घेताना शहरात विकासाची दमदार वाटचाल केली होती. या कथेच्या माध्यमातून हीच परंपरा पुढे नेण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत, अशा भावना शंकर जगताप यांनी व्यक्त केल्या आहेत.

**“लोकनेते लक्ष्मण जगताप यांनी दाखविलेल्या अध्यात्मिक आणि सामाजिक कार्याच्या मार्गावर आम्ही कार्यरत आहोत. श्रावण महिन्यामध्ये श्री अष्टविनायक शिव महापुराण कथेचे आयोजन करताना नागरिकांना अध्यात्मिक दिव्यतेची प्रचिती यावी, असा हेतू आहे. या कथा वाचनाच्या कार्यक्रमाला शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन करतो.**

**– शंकर जगताप,**
**शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या नवनियुक्त शहर पदाधिकाऱ्यांचा नाना काटेंच्या हस्ते सन्मान!

## पिंपरी चिंचवड हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला



**पिंपरी चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिचवड शहर (जिल्हा) शहराच्या युवक अध्यक्ष पदी शेखर काटे तर कार्याध्यक्षपदी प्रसाद कोलते, प्रसन्ना डांगे, तुषार ताम्हाणे यांची नियुक्ती झाल्याबद्दल माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शेखर काटे व सहकारी प्रसाद कोलते, प्रसन्ना डांगे, तुषार ताम्हाणे यांना निवडीचे पत्र दिले. पिंपरी चिंचवड हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. तो अधिकाधिक मजबूत रहावा या दृष्टीकोनातून आपल्या कामाचा ठसा उमटवणाऱ्या युवक नेतृत्वांना कार्यकारिणीत सामावून घेण्यात येत आहे. त्याच भूमिकेतून शनिवार (दि.०९) युवक अध्यक्षांसह तीन शहर कार्याध्यक्षांची नियुक्ती प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या हस्ते तसेच युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, महिला अध्यक्षा सौ. रूपालीताई चाकणकर यांच्या उपस्थितीत पुणे येथे झालेल्या एका कार्यक्रमात करण्यात आल्या आहेत.

शेखर काटे, प्रसन्न डांगे, प्रसाद कोलते,तुषार ताम्हाणे हे शहरातील युवा नेतृत्व आहेत. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघासोबत येणाऱ्या महापालिका निवडणुका डोळ्यासमोर सक्षम आणि जनतेमध्ये स्थान असणाऱ्या नेतृत्वास राष्ट्रवादीकडून कार्यकारणीमध्ये स्थान देण्यात येत आहे. त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी ते यशस्वीरित्या पार पाडावी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ध्येय धोरणे सामान्य जनतेपर्यंत पोहचवावी अशा सुचना देखील नाना काटे यांनी नवनियुक्त पदाधिकारी यांना केली.

# मंदिराच्या कामासाठी ५१ हजाराचा धनादेश!

## शिक्षक दिनाचे औचित्य साधून १०१ शिक्षकांचा सन्मान




**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठवाडा जनविकास संघातर्फे कै.शकुंतला श्रीपती पवार यांच्या स्मरणार्थ वृक्षमित्र अरुण पवार व सरपंच बालाजी पवार यांच्या वतीने पिंपळे गुरव येथील श्री भैरवनाथ मंदिराच्या मखराच्या चांदीकामासाठी एक्कावन्न हजाराचा धनादेश मंदिर समितीचे अध्यक्ष राजेंद्र जगताप, पिंपळे गुरव भजनी मंडळाचे अध्यक्ष जयराम देवकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून १०१ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षक व शिक्षिका यांनी त्यांना आलेले नाविन्यपूर्ण अनुभव सांगितले. तसेच शिक्षकदिनाचे महत्त्व सांगितले.

यावेळी बोलताना अरुण पवार हे म्हणाले, की येणाऱ्या काळामध्ये शिक्षकांच्या ज्या काही समस्या, प्रश्न असतील ते मार्गी कसे लावता येतील यासाठी आपण प्रयत्नशील असणार आहे.

मुख्याध्यापिका माधुरी लवटे यांनी त्यांच्या सर्व शिक्षकवृंदांच्या वतीने विचार व्यक्त करीत अरुण पवार यांचे आभार मानले.

यावेळी ह.भ.प. संजय पाटील महाराज, ह.भ.प. लक्ष्मण महाराज पाटील, ह.भ.प. बब्रूवाहन वाघ महाराज, ह. भ. प. विक्रम महाराज जाधव, ह.भ.प. संजय महाराज हिवराळे, मराठवाडा जनविकास संघाचे अध्यक्ष अरुण पवार, महाराष्ट्र कामगार पुरस्कार प्राप्त बाळासाहेब साळुंखे सरपंच बालाजी पवार, माजी स्वी. नगरसेवक शिवाजी पाडुळे, सूर्यकांत कुरुलकर, किशोर पिंगळेकर, प्रकाश इंगोले, बालाजी पांचाळ, अनिता पांचाळ, दत्तात्रय धोंडगे, मुख्याध्यापिका माधुरी लवटे, मुख्याध्यापिका भारती वरने, शिक्षिका संगीता गिरी, वंदना वाघ, मालन गायकवाड, संजीवनी राऊत, मंजुश्री भालचिम, रजनी पळसे, सुनीता काडे, सोनाली सुडके, धनश्री चौगुले, संगीता आव्हाड, मनीषा देरेकर, मंगल शेळकंदे, मुक्ता असवले, शोभा माने, स्नेहा कांबळे, सुनीता बामणे, रूपाली शिंदे, सत्यभामा मुळूक, इंदू लांगी, अंजना बारवे, शिक्षक संतोष वाघमारे, मल्हारराव शेळके, नामदेव भालचिम, हिरामण खामकर, महिपती पाटील, मारुती आवरगंड, बळीराम माळी, सौदागर मांगलकर, तानाजी काटे, प्रल्हाद झरांडे, मुकेश पवार, तसेच भीष्माचार्य जेष्ठ नागरिक संघ, संत गाडगेबाबा जेष्ठ नागरिक संघ व भैरवनाथ जेष्ठ नागरिक संघाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# फलक लावून मुख्यमंत्री होता येत नाही!

## मुख्यमंत्री होण्यासाठी १४५ हा जादुई आकडा गाठणे आवश्यक

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

फलक उभारून मुख्यमंत्री किंवा पालकमंत्री होता येत नाही. मुख्यमंत्री होण्यासाठी १४५ जागांचा जादुई आकडा गाठावा लागतो, अशी प्रतिक्रिया राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात पत्रकारांनी बोलताना रविवारी दिली.

उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी हा आकडा गाठला. त्यामुळे त्यांना मुख्यमंत्रीपद मिळाले, असेही अजित पवार यांनी सांगितले. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी होऊन उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या अजित पवार यांचा शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने रविवारी रोड शो आयोजित करण्यात आला होता.



रोड शो पूर्वी त्यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात दर्शन घेतले. अजित पवार यांच्या रोड शो निमित्ताने भावी मुख्यमंत्री असे त्यांच्या नावाचे फलक उभारण्यात आले होते. यासंदर्भात त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. 'मुख्यमंत्री होण्यासाठी १४५ हा जादुई आकडा गाठणे आवश्यक असते. जो हा आकडा गाठतो तो मुख्यमंत्री होतो. फलक उभारून कोणी भावी मुख्यमंत्री होत नाही. अलीकडे फलक उभारण्याचे नवा प्रकार उदयास येत आहे. काही दिवसांपूर्वी राज ठाकरे, पंकजा मुंडे यांचे फलक लागले आहेत. मुंबई येथील राष्ट्रवादी भवनाच्या बाहेर माझे, जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांचे असेच फलक लागले होते. फलक लावण्यास कोणी नेते सांगत नाहीत,' असे पवार यांनी स्पष्ट केले. मराठा आरक्षणाच्या तिढ्याबाबत बोलताना ते म्हणाले की, राज्य सरकारकडून अर्जुन खोतकर यांनी मनोज जरांगे पाटलांची भेट घेतली. त्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र अद्याप त्यावर तोडगा निघालेला नाही. या विषयावर विरोधी पक्षाची बाजू जाणून घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी सोमवारी बैठक बोलवली आहे. ओबीसी, कुणबी समाजाला न दुखवता मराठा समाजाला आरक्षण कसे देता येईल, याबाबत बैठकीत चर्चा होणार आहे. दरम्यान, अजित पवार यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतेल. यावेळी शहर राष्ट्रवादी काँग्रेसकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले. पगडी घालून अजित पवार यांनी शहराच्या विविध भागात रोड शो केला. त्यावेळी त्यांच्यावर फुलांची उधळण करण्यात आली. रोड शोमुळे धनकवडी परिसरात काही काळ वाहतूक कोंडी झाल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या. दरम्यान, खेड शिवापूर येथे रोड शो समारोप झाला.

# कोपर्डी प्रकरणातील आरोपीची कारागृहात आत्महत्या!

## आरोपी जितेंद्र शिंदेला सुनावण्यात आली होती जन्मठेपेची शिक्षा

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

महाराष्ट्राला हादरवून टाकणाऱ्या कोपर्डी बलात्कार प्रकरणातील आरोपीने कारागृहात जीवन संपवले. जितेंद्र शिंदे असे आरोपीचे नाव आहे. शिंदे याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. या हत्याकांडातील आरोपी जितेंद्र शिंदे याने पुण्यातील येरवड्या कारागृहातील बराकमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेने एकच खळबळ उडाली असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. आज पहाटेच्या सुमारास पोलिस गस्तीसाठी गेले असताना हा आत्महत्येचा प्रकार उघडकीस आला. दरम्यान, वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. अहमदनगर जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील कोपर्डी येथील शाळकरी मुलीवर बलात्कार करून तिचा खून करण्यात आला होता. या घटनेने संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली होती. हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात दाखल करण्याचीही मागणी करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणाची अहमदनगर जिल्हा न्यायालयात सुनावणी झाली होती. यावेळी कोर्टाने आरोपीला फाशीची शिक्षा दिली होती. दरम्यान, कोपर्डीतील पीडित कुटुंबासाठी राज्य सरकारने सकारात्मक पावलं उचलली होती. कोपर्डीतील निर्भयाच्या भावाला महसूल विभागात नोकरी देण्यात आली होती. तो २०१९मध्ये कर्जतच्या तहसीलदार कार्यालयात




शिपाईपदावर रूजू झाला होता. कोपर्डीतील शाळकरी मुलीवर बलात्कार करून खून केल्याबद्दल तिघा जणांना फाशीची शिक्षा झाली होती. जितेंद्र ऊर्फ पप्पू शिंदे याच्या कुकृत्याने कोपर्डी गाव हादरले होते. ही घटना १३ जुलै २०१६ रोजी घडली होती. त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी जितेंद्र बाबूलाल शिंदे (वय २५, रा. कोपर्डी) याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पकडले होते. शालेय मुलीवर निर्दयीपणे अत्याचार करून राक्षसी वृत्तीने तिचा खून केला, ही घटना कोणाही सामान्य माणसाला संताप आणणारी होती. त्यामुळेच आरोपी नितीन भैलुमे आणि संतोष भवाळ यांच्यावर न्यायालयाच्या जुन्या इमारत परिसरात दोनदा हल्ला झाला होती. तर न्यायालयाच्या नव्या इमारतीच्या आवारात 'शिवबा' संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सशस्त्र हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. १. मुख्य आरोपी जितेंद्र शिंदे याला विनयभंग प्रकरणी ३ वर्षे सक्तमजुरी, बलात्कार व कटात सहभाग प्रकरणात जन्मठेप, २० हजारांचा दंड, खून केल्याप्रकरणी फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. २. संतोष भवाळ गुन्ह्यास प्रोत्साहन, विनयभंग- ३ वर्षे सक्तमजुरी, बलात्कारास प्रोत्साहन- जन्मठेप, २० हजार दंड. न भरल्यास ३ वर्षे कैद. कट सहभाग, खून, गुन्ह्यास प्रोत्साहन फाशीची शिक्षा. ३. नितीन भैलुमे याला कट रचला, बलात्कारास प्रोत्साहन म्हणून जन्मठेपेच्या शिक्षेसह २० हजार दंड. दंड न भरल्यास ३ वर्षे साधी कैद. तर कटात सहभाग, खुनास प्रोत्साहन फाशीची शिक्षा देण्यात आली.

### आरोपीवर हल्ला...

**» शालेय मुलीवर निर्दयीपणे अत्याचार करून राक्षसी वृत्तीने तिचा खून केला, ही घटना कोणाही सामान्य माणसाला संताप आणणारी होती. त्यामुळेच आरोपी नितीन भैलुमे आणि संतोष भवाळ यांच्यावर न्यायालयाच्या जुन्या इमारत परिसरात दोनदा हल्ला झाला होती. तर न्यायालयाच्या नव्या इमारतीच्या आवारात 'शिवबा' संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सशस्त्र हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता.**

# भूखंड तुटपुंज्या भाडेतत्त्वावर देण्याचा घाट!

## कोट्यावधींचा भूखंड हाडपण्याचा प्रयत्न फसला

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रशासकीय राजवटीत डाळींब यार्डच्या नावाखाली कोट्यावधींचा भूखंड हाडपण्याचा प्रयत्न फसला होता. प्रस्तावित अद्ययावत बाजार उभारणीसाठी ठेवलेली कोट्यवधी रुपयांची मोक्याची जागा मासळी मार्केटसाठी ठराविक तीस विक्रेत्यांना तुटपुंज्या भाडेतत्त्वावर देण्याचा घाट घातला जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे मासळी मार्केटच्या नावाखाली तोच प्रकार पुन्हा सुरू झाल्याची चर्चा बाजारात सुरू आहे. मार्केट यार्डातील मुख्य प्रवेशद्वाराच्या समोरील शिवनेरी रस्त्यालगत असलेल्या मोक्याच्या पार्किंगच्या जागेत मासळी बाजार होणार आहे. मासळी बाजाराला अडते, व्यापारी आणि जैन संघटनांनी विरोध केला आहे. या निर्णयाच्या विरोधात सोमवारी (ता.११) बाजार समितीच्या कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.



प्रशासकीय राजवटीमध्ये काही पदाधिकाऱ्यांनी डाळिंब यार्ड उभारण्याच्या नावाखाली कोट्यवधी रूपयांच्या आर्थिक व्यवहाराची चर्चा झाल्यानंतर आणि माध्यमांनी भूखंड गिळकृत करण्याचा हा प्रकार उघडकीस आणला होता. त्यानंतर पणन संचालकांनी या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले होते. 'यानंतर हे प्रकरण थंड झाले. मार्केट यार्डच्या आजूबाजूचे स्थानिक रहिवासी, नागरिक, अडते, व्यापारी यांचा मासळी बाजाराला विरोध असताना, संचालक मंडळाने मासळी बाजार उभारण्यावर ठाम असल्याची माहिती समोर येत आहे. संचालक मंडळाच्या या निर्णयाच्या विरोधात विविध संघटनांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे देखील गाऱ्हाणे मांडले आहे. 'प्रशासकिय राजवट संपल्यानंतर आलेल्या संचालक मंडळाने आता बाजार समिती कायद्यातील नियमन असलेल्या चिकन, मासळीचा आधार घेत, या भूखंडावर मासळी बाजार उभारण्याचा घाट घातला आहे. या निर्णयाला स्थानिक आमदार माधुरी मिसाळ यांनी देखील विरोध केला असून, त्यांनी या निर्णयाबाबत अधिकाऱ्यांची एका संचालकासमोर कान उघडणी केल्याचे समजते. तर या एका संचालकांना देखील मासळी बाजार होऊ देऊ नका अशी तंबी दिली आहे.

> **"बाजार समितिचे संचालक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहेत. शेतकऱ्यांना फायदा व्हावा या दृष्टीने कायद्यानुसार नियमनात असलेल्या मासळीचा बाजार सुरू करण्यासाठी संचालक मंडळाने ठराव केला आहे. त्यानुसार संबंधित जागेत मासळी बाजार सुरू केला जाणार आहे.**
> **- दिलीप काळभोर,**
> **सभापती,**
> **कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे.**

> **"पार्किंगची जागा भविष्यातील वाहनांची संख्या पाहता बाजार आवारासाठी आवश्यक आहे. तसेच बाजार आवारातील बहूसंख्य व्यावसायिक हे शाकाहारी असून अशा प्रकारे पोल्ट्री आणि फिश मार्केटला परवानगी दिल्यास आजूबाजूच्या संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरू शकते. त्याचा विपरीत परिणाम आजूबाजूला वास्तव्यास असणाऱ्या समाज घटकांवर होणार आहे. याबाबत अनेक संघटना तसेच अनेक मा. नगरसेवक आणि आमदार यांनी कळविले आहे. तरी वरील सर्व बाबींचा विचार करता येथे पोल्ट्री आणि फिश मार्केटचा प्रस्ताव रद्द करायला हवा.**
> **- राजेंद्र बाठीया,**
> **अध्यक्ष, दि पूना मर्चंटस् चेंबर**

# 'मूर्ती आमची किंमत तुमची' गरजूंसाठी अनोखा उपक्रम!

## प्रल्हाद गवळी मित्र परिवाराचा पुढाकार

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सध्या सगळीकडे सुंदर रंगानी सजवलेल्या विविध आकाराच्या गणपती बाप्पांच्या मोहात पाडणाऱ्या मूर्ती दिसत आहेत. पण या मूर्तींची किंमत अनेकांना परवडणारी नसते. लहान मुलांचा देखील हट्ट असतोच की मोठी बाप्पांची मूर्ती हवी. या गोष्टींचा विचार करीत पुण्यातील प्रल्हाद गवळी मित्र परिवार तर्फे 'मूर्ती आमची किंमत तुमची' या उपक्रमाची सुरवात करण्यात आली आहे. मनसेचे शहर संघटक प्रल्हाद गवळी यांनी रविवार पेठेत हा उपक्रम राबविला आहे. उपक्रमाची सुरुवात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते गणरायाची आरती करून झाली. त्यांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात पाच नागरिकांना गणेश मूर्ती देण्यात आल्या. यंदा ७ हजार ५०० गणेश मूर्ती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या गणेशमूर्ती असून नागरिकांनी मूर्तीची किंमत ठरवून कलशामध्ये ती रक्कम टाकायची आहे. साईनाथ चकोर, हेमंत कंठाळे, नरेश देवकर, जीवन गायकवाड, विक्रम लगड, गौरव गवळी, भाई कात्रे, श्रीराज पवार, विकास गवळी यांनी उपक्रमासाठी परिश्रम घेतले. प्रल्हाद



गवळी म्हणाले, कोविड काळापासून 'मूर्ती आमची किंमत तुमची' या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. उपक्रमाचे यंदा तिसरे वर्ष आहे. या उपक्रमाला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. हल्ली गणेश मूर्तींच्या किमती वाढल्या आहेत. अनेक कुटुंबांना या मोठ्या मूर्ती घेणे शक्य होत नाही, पण मोठ्या मूर्ती घेण्याचा मुलांचा हट्ट असतो. यामुळे मूर्ती आमची किंमत तुमची या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. कोणाकडे पैसे नसतील तर विनामूल्य मूर्ती देखील देण्यात येते. लोकसेवा प्रतिष्ठान संचलित नेताजी सुभाष चंद्र बोस सैनिकी शाळेच्या १०१ विद्यार्थ्यांनी राज ठाकरे यांचे लाईव्ह चित्र यावेळी काढले. यावेळी आदिमाया ढोल ताशा पथक लोकसेवा प्रतिष्ठान संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळेच्या पथकाने वादन केले.

> **"कोविड काळापासून 'मूर्ती आमची किंमत तुमची' या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. उपक्रमाचे यंदा तिसरे वर्ष आहे. या उपक्रमाला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. हल्ली गणेश मूर्तींच्या किमती वाढल्या आहेत. अनेक कुटुंबांना या मोठ्या मूर्ती घेणे शक्य होत नाही, पण मोठ्या मूर्ती घेण्याचा मुलांचा हट्ट असतो. यामुळे मूर्ती आमची किंमत तुमची या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. कोणाकडे पैसे नसतील तर विनामूल्य मूर्ती देखील देण्यात येते. -प्रल्हाद गवळी**